मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# जुनी सांगवीत मोकाट कुत्र्यांचा कहर; महिलेवर हल्ला!

## पालिकेच्या दुर्लक्षाचा नागरिकांचा आरोप; मधुबन सोसायटी परिसरात भीतीचे वातावरण!

» पिंपरी | प्रतिनिधी

**जुनी सांगवी परिसरातील मधुबन सोसायटी, लेन क्रमांक ४ येथे बुधवारी (दि. २६) सकाळी सुमारे ११.०४ वाजण्याच्या सुमारास मोकाट कुत्र्याने केलेल्या हल्ल्यात एक महिला आणि तिचे एक वर्षीय बालक जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, एक महिला आपल्या एक वर्षाच्या बालकाला कडेवर घेऊन K.G. SCHOOL (डॉल्फिन स्कूल) परिसरातून जात होती. त्यावेळी अचानक एका मोकाट कुत्र्याने महिलेवर झडप घातली. कुत्र्याने महिलेच्या पायाला चावा घेतला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे महिला घाबरली आणि तिच्या कडेवरील एक वर्षीय बालक खाली पडले. या घटनेत बालकालाही दुखापत झाली.

जुनी सांगवी परिसरात मोकाट कुत्र्यांचा वावर दिवसेंदिवस वाढत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेषतः महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना रस्त्यावरून ये-जा करताना मोठा धोका निर्माण झाला आहे. अचानक अंगावर धावून येणाऱ्या कुत्र्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मधुबन सोसायटी आणि परिसरातील मोकाट कुत्र्यांच्या समस्येबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी महापालिकेने प्रभावी उपाययोजना करणे अपेक्षित असताना प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

### महिलेवर हल्ला; बालक खाली पडल्याने मोठी दुर्घटना टळली

या घटनेतील सर्वात गंभीर बाब म्हणजे कुत्र्याने हल्ला केला त्यावेळी महिलेच्या कडेवर एक वर्षाचे बालक होते. हल्ल्यामुळे महिला गोंधळल्याने बालक खाली पडले. त्यामुळे बालकाला दुखापत झाली. या घटनेत मोठी दुर्घटना टळली असली तरी भविष्यात अशाच प्रकारच्या हल्ल्यात गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

### ‘मोठी दुर्घटना होण्याची वाट पाहणार का?’

मोकाट कुत्र्यांच्या समस्येकडे महापालिका प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्यानंतरही कारवाई होत नसेल तर एखादी मोठी दुर्घटना घडण्याची वाट प्रशासन पाहत आहे का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. महापालिकेने तातडीने परिसराची पाहणी करून मोकाट कुत्र्यांवर नियमानुसार कारवाई करावी, तसेच यापूर्वी करण्यात आलेल्या तक्रारींची दखल घेऊन प्रभावी उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

# प्रभाग क्र.१६ मध्ये गुरुवारी ‘आमदार आपल्या दारी’ उपक्रमाचे आयोजन!

» पिंपरी | प्रतिनिधी

**चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकाराने प्रभाग क्रमांक १६ मधील रावेत, किवळे आणि मामुर्डी परिसरातील नागरिकांच्या समस्या थेट जाणून घेऊन त्यांचे तत्काळ निराकरण करण्याच्या उद्देशाने ‘आमदार आपल्या दारी’ या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध नागरी प्रश्नांवर प्रशासन आणि नागरिक यांच्यात थेट संवाद घडवून आणण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.**




गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत रावेत येथील समीर लॉन्स येथे हा उपक्रम पार पडणार आहे. प्रभाग क्रमांक १६ मधील नागरिकांना या उपक्रमाच्या माध्यमातून आपल्या परिसरातील समस्या थेट आमदार शंकर जगताप तसेच संबंधित शासकीय आणि महापालिका विभागांच्या अधिकाऱ्यांसमोर मांडता येणार आहेत.

पाणी, वीज, ड्रेनेजपासून महापालिका तक्रारींपर्यंत समस्या मांडता येणार.‘आमदार आपल्या दारी’ उपक्रमात नागरिकांना विविध प्रकारच्या नागरी आणि शासकीय समस्यांबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. परिसरातील पाणीपुरवठा, वीज, ड्रेनेज, रस्ते, स्वच्छता तसेच महापालिकेशी संबंधित विविध तक्रारी नागरिकांना थेट संबंधित अधिकाऱ्यांसमोर मांडता येतील.

याशिवाय शासनाच्या विविध योजना, शासकीय दाखले, रेशनकार्ड आणि इतर शासकीय कामांबाबत नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांना थेट संबंधित विभागाकडे मांडण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे.

आमदारांसह संबंधित अधिकारी राहणार उपस्थित. नागरिकांच्या समस्या केवळ ऐकून न घेता त्यावर संबंधित विभागांकडून तातडीने कार्यवाही व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना विविध कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याऐवजी एकाच ठिकाणी आपली समस्या मांडता येणार आहे.

प्रभाग क्रमांक १६ मधील नागरिकांच्या स्थानिक प्रश्नांना प्राधान्य देऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन.रावेत, किवळे आणि मामुर्डी परिसरातील नागरिकांनी आपल्या समस्या, तक्रारी आणि शासकीय कामांबाबत आवश्यक कागदपत्रांसह या उपक्रमाला उपस्थित राहावे आणि ‘आमदार आपल्या दारी’ या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार शंकरभाऊ जगताप यांनी केले आहे.

**कार्यक्रमाचा तपशील :**

दिनांक : गुरुवार, २७ ऑगस्ट २०२६

वेळ : सकाळी १० ते दुपारी ४

स्थळ : समीर लॉन्स, रावेत, पिंपरी-चिंचवड

लाभार्थी : प्रभाग क्रमांक १६ – रावेत, किवळे, मामुर्डी परिसरातील नागरिक.

या उपक्रमामुळे स्थानिक पातळीवरील नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांना थेट प्रशासनासमोर मांडण्याची संधी मिळणार असून, संबंधित विभागांकडून त्यावर तत्काळ कार्यवाही होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# परिसरात तंबाखू विक्रेत्यांवर पोलिसांचा 'सर्जिकल स्ट्राइक'!

## विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना दणका; पिंपरी-चिंचवड पोलिसांची धडक कारवाई!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थ आणि सिगारेट सहज उपलब्ध करून देणाऱ्या विक्रेत्यांविरोधात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. परिमंडळ-२ अंतर्गत शाळा व महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या तब्बल १९ टपऱ्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे परिसरातील तंबाखू विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.**




शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असल्याने अल्पवयीन विद्यार्थी व्यसनाच्या विळख्यात सापडण्याचा धोका वाढतो. विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी अशा विक्रेत्यांविरोधात विशेष मोहीम हाती घेतली. या मोहिमेत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या टपऱ्यांवर थेट कारवाई करण्यात आली.

शाळा आणि महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री रोखण्यासाठी पोलिसांकडून विशेष तपासणी आणि कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान १९ टपऱ्या निष्कासित करण्यात आल्या.

पोलिसांच्या या कारवाईमुळे शैक्षणिक संस्थांच्या आसपास तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांना चांगलाच धक्का बसला आहे. विद्यार्थ्यांना तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू ठेवण्याची मागणी नागरिकांकडूनही होत आहे.

शाळा-महाविद्यालयांच्या आसपास तंबाखू आणि सिगारेटची विक्री होत असल्याने विद्यार्थ्यांना हे पदार्थ सहज उपलब्ध होतात. त्यामुळे शैक्षणिक संस्थांच्या परिसरात अशा पदार्थांची विक्री होऊ नये, यासाठी पोलिसांनी आता कठोर भूमिका घेतली आहे.

१९ टपऱ्यांवर करण्यात आलेली कारवाई ही विक्रेत्यांसाठी स्पष्ट इशारा मानली जात आहे. यापुढेही नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाईचा बडगा उगारला जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पोलीस सहआयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) सारंग आवाड तसेच अपर पोलीस आयुक्त (प्रादेशिक) बसवराज तेली यांच्या निर्देशानुसार ही विशेष कारवाई करण्यात आली.

पोलीस उपआयुक्त संदीप आटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित सहाय्यक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकाने ही मोहीम राबविली.

विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता लक्षात घेऊन शैक्षणिक संस्थांच्या परिसरातील तंबाखू विक्रीवर पोलिसांकडून विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. केवळ एकदाच कारवाई न करता अशा प्रकारच्या मोहिमा यापुढेही अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर पोलिसांनी थेट कारवाई केल्याने नागरिकांकडून या मोहिमेचे स्वागत होत आहे.

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचा ॲक्शन प्लॅन!

शाळा-महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या टपऱ्यांवर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी धडक कारवाई केली. या मोहिमेत तब्बल १९ टपऱ्या निष्कासित करण्यात आल्या. विद्यार्थ्यांना तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी आणि शैक्षणिक परिसर सुरक्षित ठेवण्यासाठी यापुढेही अशा कारवाया अधिक प्रभावीपणे सुरू ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# नागरी समस्यांवर उपमहापौर शर्मिला बाबर ॲक्शन मोडवर!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**निगडी प्राधिकरण परिसरातील स्वच्छता, अतिक्रमण आणि विविध नागरी समस्यांचा आढावा घेण्यासाठी उपमहापौर शर्मिला बाबर यांनी प्रत्यक्ष परिसराची पाहणी केली. नागरिकांच्या समस्या केवळ कागदोपत्री न पाहता प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन त्यांची परिस्थिती जाणून घेऊन तातडीने उपाययोजना करण्याच्या उद्देशाने ही पाहणी करण्यात आली. यावेळी नागरिकांनी मांडलेल्या विविध समस्यांची दखल घेत संबंधित महानगरपालिका अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.**




पाहणीदरम्यान उपमहापौर शर्मिला बाबर यांनी प्राधिकरण परिसरातील स्थानिक व्यापारी, रहिवासी तसेच नागरिकांशी थेट संवाद साधला. यावेळी नागरिकांनी स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, अतिक्रमण, रस्ते, सार्वजनिक जागा आणि दैनंदिन नागरी सुविधांशी संबंधित विविध समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. नागरिकांच्या अडचणी समजून घेत प्रत्येक समस्येची माहिती घेण्यात आली.

परिसरातील स्वच्छतेबाबत नागरिकांकडून करण्यात आलेल्या तक्रारींची उपमहापौरांनी गंभीर दखल घेतली. सार्वजनिक ठिकाणी कचरा साचणार नाही, परिसरात नियमित स्वच्छता राखली जाईल आणि नागरिकांना अस्वच्छतेचा त्रास होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या. कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचेही निर्देश देण्यात आले.

> "पिंपरी चिंचवड शहरातील सर्व नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिकता आहे. स्वच्छता, अतिक्रमण, रस्ते आणि इतर मूलभूत नागरी सुविधांबाबत आवश्यक त्या उपाययोजना करून नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. प्रशासनाच्या सहकार्याने प्रभागातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावून परिसर अधिक स्वच्छ, सुंदर आणि सुव्यवस्थित करण्यासाठी काम केले जाईल."
>
> **-शर्मिला राजेंद्र बाबर, उपमहापौर, पिंपरी चिंचवड महापालिका**

तसेच प्राधिकरण परिसरातील अतिक्रमणाच्या प्रश्नावरही उपमहापौर बाबर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या. रस्ते, सार्वजनिक जागा आणि नागरिकांच्या दैनंदिन वापरातील ठिकाणी अतिक्रमणामुळे वाहतूक आणि नागरिकांच्या ये-जा करण्यास अडथळा निर्माण होणार नाही, यासाठी नियमांनुसार आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.

नागरिकांच्या तक्रारींवर केवळ आश्वासन न देता संबंधित विभागाशी थेट संपर्क साधून कार्यवाही करण्यावर यावेळी भर देण्यात आला. त्यामुळे प्राधिकरण परिसरातील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या नागरी समस्यांना आता प्रशासनाच्या पातळीवर गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित समस्या तातडीने सोडविण्यासाठी महापालिका प्रशासनाने अधिक सक्रियपणे काम करण्याची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित झाले. परिसरातील स्वच्छता, अतिक्रमण आणि मूलभूत नागरी सुविधांबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत असल्याने त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली.

दरम्यान, या पाहणीवेळी प्राधिकरण व्यापारी असोसिएशनचे कार्याध्यक्ष हेमंत मिश्रा, नंदकुमार पाचपोर, चंद्रकांत बोडके, संग्राम साळुंखे, पवन सूर्यवंशी, कमलेश जैन, रितपाल सिंह तसेच सिंधुनगर येथील रहिवासी उपस्थित होते. नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन त्यावर तातडीने कार्यवाही करण्याच्या भूमिकेमुळे आता संबंधित विभागाकडून पुढील कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# चाकणच्या समस्यांवर सरकारचा ‘सर्जिकल स्ट्राइक’!

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीचा आढावा

**» पुणे | प्रतिनिधी**

**चाकण परिसरातील विविध समस्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणा आणि संस्थांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. चाकणच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीने कामाचा रोडमॅप तयार केला असून, समितीला आवश्यक त्या सूचना व मागण्या ऐकून घेऊन काम करण्यास पूर्ण सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले.**

शासकीय विश्रामगृह येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी चाकण परिसरातील विविध प्रश्न तसेच चाकणच्या सर्वांगीण विकासासाठी गठित उच्चस्तरीय समितीच्या कामकाजाचा आढावा घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी खेड-आळंदीचे आमदार बाबाजी काळे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पीएमआरडीए आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या की, चाकणच्या समस्या सोडविण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणा एकाच व्यासपीठावर आल्या असून, ही सकारात्मक बाब आहे. समितीच्या माध्यमातून विविध प्रश्नांचा सखोल अभ्यास करून त्यावर टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात येत आहे, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.



**३१ ऑगस्टपर्यंत खड्डे बुजविण्याचे निर्देश**

चाकण परिसरातील रस्त्यांवरील खड्ड्यांचा प्रश्न तातडीने सोडविण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, 31 ऑगस्टपर्यंत खड्डे बुजविण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. रस्त्यांची दुरुस्ती, वाहतूक कोंडीची ठिकाणे आणि वाहतूक व्यवस्थापन याबाबतही प्राधान्याने कार्यवाही करण्यात येत आहे.

### कचरा व्यवस्थापनासाठी प्रकल्प

कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर एमआयडीसीशी चर्चा झाली असून कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. प्रकल्प उभारणीचे काम पुढे नेण्यात येत आहे. कोणत्याही प्रकल्पाला काही कालावधी लागतो; मात्र कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट केले.

### सुरक्षेसाठी १०० कर्मचारी नियुक्त

चाकण परिसरातील वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि वाहतुकीचे वाढते प्रमाण लक्षात घेता सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. यासाठी तातडीने १०० सुरक्षा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही करण्यात येत असून, आवश्यकतेनुसार नवीन पोलिस ठाणी उभारण्याबाबतही कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. चाकण हे मोठे औद्योगिक केंद्र असून देश-विदेशातून अनेक नागरिक व उद्योजक येथे येतात. त्यामुळे परिसराची स्वच्छता, सुरक्षितता आणि पायाभूत सुविधा दर्जेदार असणे आवश्यक आहे. चाकणमध्ये येताना रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा व प्लास्टिक दिसणे ही चिंतेची बाब आहे. या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी संबंधित यंत्रणांशी चर्चा करण्यात आली आहे, असेही त्यांनी सांगितले.

---

# तलाव कोरडे, पिके करपण्याच्या मार्गावर; चासच्या पाण्याची आस

**» पुणे | प्रतिनिधी**

**पावसाने यंदा ऐन पावसाळ्यातच पाठ फिरवल्याने शिरूर तालुक्याच्या पूर्व भागातील तलाव कोरडेठाक पडले आहेत. यामुळे शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, नुकतेच सुरू झालेल्या चासकमान डाव्या कालव्याच्या आवर्तनात तलाव पूर्ण क्षमतेने भरून द्यावेत, अशी आग्रही मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. शिरूर तालुक्यासाठी वरदान ठरणारे चासकमान धरण यंदा पावसाने पूर्ण क्षमतेने भरले होते. त्यामुळे महिनाभरापूर्वी डाव्या कालव्याला पाण्याचे आवर्तन सोडण्यात आले होते. मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे काही दिवसांपूर्वी हे पाणी अचानक बंद करण्यात आले. याविरोधात शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर प्रशासनाला नमते घ्यावे लागले आणि पुन्हा कालव्याला पाणी सोडण्यात आले.**

यंदा मे महिन्यातच शिरूर तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी चासकमान डाव्या कालव्याचे आवर्तन सोडण्यात आले होते; मात्र कमी कालावधीसाठी आणि अल्प क्षमतेने आलेल्या या पाण्यामुळे तालुक्यातील सर्वच तलाव भरू शकले नव्हते. परिणामी अनेक शेतकरी सिंचनाच्या पाण्यापासून वंचित राहिले, तर शिरूरच्या पूर्व भागातील बहुतांश पिके पाण्याअभावी करपून गेली होती. जुलै महिन्यात सलग तीन दिवस झालेल्या रिमझिम



पावसाने पिकांना काहीसा दिलासा मिळाला. मात्र त्यानंतर पुन्हा पावसाने दडी मारल्याने ऐन पावसाळ्यातच पिके जळण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे आता चासकमान डाव्या कालव्याच्या आवर्तनाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, चासकमान डाव्या कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम काही भागांत सुरू झाले आहे. हे काम टप्प्याटप्प्याने शेवटपर्यंत पूर्ण करण्यात यावे, या मागणीसाठी पूर्व भागातील शेतकऱ्यांनी आंदोलन छेडले होते. त्यामुळे काही ठिकाणी काम रखडले आहे. अस्तरीकरणाच्या कामाचे कारण पुढे करत पावसाळ्यातील आवर्तन अर्ध्यावरच बंद करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न होता, अशी माहिती चासकमान कालवा कृती समितीच्या वतीने देण्यात आली. मात्र शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर प्रशासनाला माघार घ्यावी लागली आणि आवर्तन सुरूच ठेवण्यात आले.

शिरूरच्या पूर्व भागातील कोळगाव डोळस, आंधळगाव, निर्वि आणि निमोणे या गावांतील तलाव सध्या पूर्णतः कोरडे पडले असून, या भागातील शेतकऱ्यांचे डोळे आता आभाळाकडे लागले आहेत. पावसाने साथ न दिल्यास उभी पिके वाचविणे कठीण होणार आहे. अशा परिस्थितीत चासकमान डाव्या कालव्याचे आवर्तन पुन्हा सुरू झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. या आवर्तनातून तालुक्यातील लहान-मोठे सर्व तलाव पूर्ण क्षमतेने भरावेत, तसेच कालव्याच्या शेवटच्या घटकापर्यंत मुबलक पाणी पोहोचावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून जोर धरत आहे.

कालव्याचे पाणी सोडताना नियमानुसार ते शेवटच्या भागापासून सोडणे अपेक्षित असते. त्यामुळे उर्वरित दिवसांत संबंधित भागाला पूर्ण क्षमतेने पाणी मिळण्यास मदत होते. मात्र प्रत्यक्षात पाणी आधीच्या भागातच सोडले जात असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. त्यातच खेड भागातील काही शेतकरी नेत्यांच्या वरदहस्तामुळे शिरूरसाठी आवर्तन सुरू असतानाही काही ठिकाणी पोटचाऱ्यांचे दरवाजे उघडून पाणी घेतले जाते, तर काही शेतकरी थेट कालव्यावर विद्युत पंप जोडून पाण्याचा उपसा करतात, असा आरोप केला जात आहे.

### शिरूरच्या बळीराजाची जोरदार मागणी!

यंदा तरी चासकमानच्या आवर्तनातून शिरूर तालुक्याला पूर्ण क्षमतेने आणि अधिक कालावधीसाठी पाणी मिळावे, कालव्यावरील अनधिकृत पाणीउपसा रोखावा आणि शेवटच्या घटकापर्यंत पुरेसे पाणी पोहोचवावे, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. विशेषतः पूर्व भागातील कोरडे पडलेले तलाव भरल्यास पिकांना मोठा आधार मिळणार असून, त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

# पुणे रेल्वेस्थानकावर अमली पदार्थांचा कोट्यवधींचा साठा!

## ॲम्फेटामाइन, क्रिस्टल मेथ आणि एमडीएमएचा मोठा साठा डीआरआयच्या हाती!

**» पुणे | प्रतिनिधी**

**पुणे रेल्वेस्थानकावर महसूल गुप्तवार्ता संचालनालयाच्या (डीआरआय) पुणे प्रादेशिक पथकाने मोठी कारवाई करत तब्बल ३ कोटी ४१ लाख रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. या प्रकरणी मिझोराममधील ३२ वर्षीय महिलेला अटक करण्यात आली आहे. तिच्याकडून ॲम्फेटामाइन, क्रिस्टल मेथ आणि एमडीएमएचा मोठा साठा हस्तगत करण्यात आला असून, या कारवाईमुळे आंतरराज्यीय अमली पदार्थ तस्करीच्या रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता आहे.**



अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव लालरेमलियानी (वय ३२, रा. रामह्लून, ऐझॉल, मिझोराम) असे आहे. डीआरआयच्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या विशिष्ट माहितीच्या आधारे मंगळवारी (दि. २५ ऑगस्ट) पहाटे पुणे रेल्वेस्थानकावर सापळा रचण्यात आला होता.

दिल्लीतील हजरत निजामुद्दीन स्थानकावरून म्हैसूरकडे जाणाऱ्या स्वर्ण जयंती एक्स्प्रेसमधून संशयित महिला प्रवास करत असल्याची माहिती डीआरआयच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार अधिकाऱ्यांनी पुणे रेल्वेस्थानकावरील फलाट क्रमांक ३ वर सापळा रचून महिलेला ताब्यात घेतले.

त्यानंतर राजपत्रित महिला अधिकाऱ्याच्या उपस्थितीत तिच्या सामानाची झडती घेण्यात आली. यावेळी २ हजार ५३२ ग्रॅम वजनाचा पांढऱ्या-पिवळ्या रंगाचा स्फटिकयुक्त पदार्थ आढळून आला. तसेच ८७८ ग्रॅम वजनाच्या विविध रंगांच्या गोळ्याही तिच्या सामानातून जप्त करण्यात आल्या.

नार्कोटिक्स डिटेक्शन किटच्या माध्यमातून या पदार्थांची प्राथमिक तपासणी केली असता ते अमली पदार्थ असल्याचे स्पष्ट झाले. जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थांची बाजारातील अंदाजे किंमत ३.४१ कोटी रुपये असल्याचे डीआरआयकडून सांगण्यात आले.

अटक करण्यात आलेल्या लालरेमलियानी हिची चौकशी केली असता तिने 'अशिमा' नावाच्या एका आफ्रिकी व्यक्तीच्या सांगण्यावरून अमली पदार्थांची वाहतूक करत असल्याची माहिती दिल्याचे समोर आले आहे. तिच्या म्हणण्यानुसार, प्रवासाचे तिकीट आणि अमली पदार्थ असलेली बॅग अशिमानेच उपलब्ध करून दिली होती.

म्हैसूरला पोहोचल्यानंतर आपले लोकेशन शेअर करून संबंधित व्यक्तीच्या ताब्यात ही बॅग देण्याच्या सूचना तिला देण्यात आल्या होत्या. त्यामुळे या संपूर्ण तस्करीच्या मागे आणखी कोण व्यक्ती किंवा टोळी कार्यरत आहे, याचा तपास डीआरआयकडून सुरू करण्यात आला आहे.

दरम्यान, आरोपी महिलेच्या मोबाईल फोनची तपासणी करण्यात आल्यानंतर तस्करीच्या रॅकेटशी संबंधित महत्त्वाचे धागेदोरे डीआरआयच्या हाती लागल्याची माहिती आहे. मोबाईलमधील संपर्क, संभाषण आणि इतर माहितीच्या आधारे या तस्करीच्या नेटवर्कचा माग काढण्याचे काम सुरू आहे.

अमली पदार्थ कुठून आणण्यात आले, ते पुणेमार्गे कुठे पोहोचवले जाणार होते, या तस्करीत आणखी किती जणांचा सहभाग आहे आणि या नेटवर्कचा मुख्य सूत्रधार कोण आहे, याचा तपास करण्यात येत आहे.

या प्रकरणी आरोपी महिलेविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, तिला विशेष एनडीपीएस न्यायालयात हजर करण्यात आले. कोट्यवधी रुपयांचा अमली पदार्थांचा साठा रेल्वेने वाहून नेण्याचा प्रयत्न उधळून लावल्याने या कारवाईला मोठे यश मानले जात आहे.

### डीआरआयच्या तपासाला वेग!

दरम्यान, या प्रकरणाच्या पुढील तपासातून आंतरराज्यीय अमली पदार्थ तस्करीच्या नेटवर्कमधील आणखी आरोपींची नावे समोर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे डीआरआयच्या पुढील तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा मोठा विजय; ३० वर्षांची वयोमर्यादा अखेर रद्द!

**» पुणे | प्रतिनिधी**

**आदिवासी विद्यार्थ्यांच्या आक्रमक आंदोलनाला अखेर मोठे यश मिळाले आहे. पुण्यातील मांजरी येथे गेल्या १३ दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाची दखल घेत राज्य सरकारने शासकीय आदिवासी वसतिगृह प्रवेशासाठी लागू केलेली ३० वर्षांची वयोमर्यादा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी याबाबत घोषणा केली असून, १४ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयातील वयाची अट शिथिल करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**



सर्वपक्षीय आदिवासी आमदार आणि खासदारांसोबत झालेल्या चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आता आदिवासी विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश घेताना ३० वर्षांची वयोमर्यादा लागू राहणार नाही. सरकारच्या या निर्णयामुळे गेल्या अनेक दिवसांपासून आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मात्र, वसतिगृह प्रवेशाची वयोमर्यादा रद्द झाली असली तरी आंदोलन अद्याप संपलेले नाही. विद्यार्थ्यांच्या इतर प्रमुख मागण्यांवर सरकारकडून ठोस निर्णय होईपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांची सर्वात प्रमुख मागणी म्हणजे उच्चशिक्षित आदिवासी तरुणांसाठी साडेचार हजार पदांची विशेष भरती करावी. या भरतीबाबत सरकारने सकारात्मक निर्णय घेऊन अधिकृत अधिसूचना काढावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे. केवळ आश्वासन नको, तर प्रत्यक्ष निर्णय आणि अधिसूचना मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका आंदोलकांनी घेतली आहे.

यासोबतच आश्रमशाळांमध्ये लागू करण्यात आलेली केंद्रीकृत स्वयंपाकघर अर्थात 'सेंट्रल किचन' पद्धत रद्द करण्याची मागणीही विद्यार्थ्यांनी केली आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेतच गरम आणि ताजे जेवण मिळावे, अशी त्यांची भूमिका आहे.

गडचिरोलीतील आश्रमशाळेत सर्पदंशामुळे तीन मुलींचा मृत्यू झाल्याचा मुद्दाही आंदोलकांनी उपस्थित केला आहे. मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात आली आहे. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले होते. राहुल गांधी यांच्या पुण्यातील कार्यक्रमादरम्यान आंदोलक विद्यार्थ्यांना आपले प्रश्न मांडण्याची संधी मिळाल्याचे विद्यार्थिनींनी सांगितले. त्यानंतर हा मुद्दा व्यापक पातळीवर पोहोचला आणि सरकारकडून हालचालींना वेग आल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

### आंदोलनाला यश, पण लढा अद्याप कायम!

मांजरीतील १३ दिवसांच्या आंदोलनानंतर सरकारने आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृह प्रवेशाची ३० वर्षांची वयोमर्यादा रद्द केली. मात्र, साडेचार हजार पदांची विशेष भरती, सेंट्रल किचन पद्धत रद्द करणे आणि सर्पदंशाने मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याच्या मागण्यांवर अद्याप ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे या मागण्या पूर्ण होईपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी केला आहे.